**<u>ठळक बातम्या</u>**

- गेल्या महिन्यात पुरामुळं झालेल्या नुकसान भरपाईपोटी आणखी सव्वा ३ हजार कोटी रुपयांच्या मदतीचा शासन निर्णय जारी

- जीएसटीतल्या कपातीमुळे यंदा बाजारपेठेतली उलाढाल २० लाख कोटी रुपयांनी वाढण्याचा सरकारला अंदाज

- देशासह राज्यात धनत्रयोदशीचा सण साजरा, दिवाळीच्या खरेदीसाठी बाजारपेठा फुलल्या

**आणि**

- नंदुरबार जिल्ह्यात रस्ते अपघातात ८ जणांचा मृत्यू झाला, २७ जखमी

**<><><><><>**

यंदा सप्टेंबर महिन्यात अतिवृष्टी आणि पुराचा फटका बसलेल्या शेतकऱ्यांना मदत देण्यासाठी आणखी ३ हजार २५८ कोटी रुपयांपेक्षा अधिक रकमेच्या मदतीचा शासन निर्णय राज्य सरकारनं आज जारी केला. राज्यभरातल्या २३ जिल्ह्यांतल्या ३३ लाख ६५ हजार ५४४ शेतकऱ्यांना या मदतीचा लाभ मिळणार आहे. नागपूर, अमरावती, पुणे, नाशिक आणि कोकण प्रशासकीय विभागातले हे शेतकरी आहेत. या जिल्ह्यांमधल्या २७ लाख ५९ हजार हेक्टर पेक्षा अधिक शेतीचं नुकसान झाल्यानं ही नुकसान भरपाई दिली जाणार आहे. गेल्या आठवडाभरात सुमारे ५ हजार कोटींच्या निधी वितरणाचे आदेश सरकारने काढले आहेत. यंदाच्या खरीप हंगामात झालेल्या नुकसानीसाठी साडे ७ हजार कोटींच्या मदतीच्या वितरणाला मान्यता दिल्याची माहिती मदत आणि पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी दिली.

**<><><><><>**

वस्तू आणि सेवा कराच्या दरांमध्ये केलेल्या कपातीमुळं यंदाच्या वर्षी देशात ग्राहकांकडून होणारी खरेदी १० टक्के म्हणजे २० लाख कोटी रुपयांनी वाढेल असा अंदाज सरकारनं व्यक्त केला आहे. केंद्रीय मंत्री निर्मला सीतारामन, पीयूष गोयल आणि अश्विनी वैष्णव यांनी आज नवी दिल्लीत वार्ताहर परिषदेला संबोधित केलं. याविषयी सविस्तर जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून…

***होल्ड कॅप्सूल***

*(जीएसटीतल्या सुधारणांमुळं देशाच्या अर्थव्यवस्थेला मोठी गती मिळाली असून सणासुदीच्या काळात इलेक्ट्रॉनिक्स, वाहनं आणि ग्राहकोपयोगी वस्तूंची मोठी खरेदी झाल्याची माहिती केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आज दिली. जीएसटी दरकपातीचे फायदे सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचत असल्याचं त्यांनी सांगितलं. यंदा नवरात्रीदरम्यान विक्रीत विक्रमी वाढ झाली असून गेल्या नवरात्रीच्या तुलनेत यंदा इलेक्ट्रॉनिक वस्तूंची विक्री २५ टक्क्यांनी वाढल्याचं अश्विनी वैष्णव म्हणाले.*

***होल्ड - बाइट अश्विनी वैष्णव***

*अप्रत्यक्ष करांच्या क्षेत्रात सरकारनं केलेल्या या सुधारणांमुळे देशात होणारी गुंतवणूक, उद्योग व्यापारातली उलाढाल, पायाभूत सुविधांवर होणार खर्च मोठ्या प्रमाणात वाढला आहे. स्वातंत्र्यानंतरच्या या खूप मोठ्या सुधारणा असल्याचं पीयूष गोयल म्हणाले.*

***होल्ड - बाइट पीयूष गोयल***

*जागतिक पातळीवर अस्थिर वातावरण असताना देशाच्या आर्थिक वृद्धीचा दर मजबूत आहे. त्यामुळं आंतरराष्ट्रीय नाणेनिधीनंही आर्थिक वृद्धीचा अंदाज सुधारून ६ पूर्णांक ६ दशांश टक्के केला आहे, असंही पीयूष गोयल यांनी सांगितलं.)*

**<><><><><>**

दिवाळीचा दुसरा दिवस असलेला धनत्रयोदशीचा सण आज सर्वत्र उत्साहात साजरा होतो आहे. घरोघरी नागरिकांनी धनलक्ष्मी, केरसुणी, दागदागिन्यांची पूजा केली. नवनवीन वस्तू, वाहनांच्या खरेदीसाठीही आज बाजारपेठेत उत्साह दिसून येत आहे. इंडिया बुलियन आणि ज्वेलरी असोसिएशननं प्रसिद्ध केलेल्या दरांनुसार मुंबईत सोन्याचे दर तोळ्यामागे १ लाख ३० हजाराच्या पलीकडे गेले आहेत. चांदी पावणे दोन लाख रुपये किलोनं मिळत आहे. गेल्या काही महिन्यांपासून ही तेजी असली, तरी आणखी तेजी होईल, या आशेनं अनेकांनी सोनं-चांदीच्या वस्तू, नाणी खरेदीला प्राधान्य दिलं.

**<><><><><>**

महाराष्ट्र आणि गुजरातचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी दिवाळीनिमित्त नागरिकांना शुभेच्छा दिल्या आहेत. दिवाळीचा सण म्हणजे अंधःकारावर प्रकाशाचा, अन्यायावर न्यायाचा आणि नकारात्मकतेवर सकारात्मकतेच्या विजयाचं प्रतीक आहे असं सांगून स्वदेशी उत्पादनांचा वापर करण्याचं आवाहन त्यांनी शुभेच्छा संदेशातून केलं आहे. पर्यावरण रक्षण, नैसर्गिक संसाधनांचा आदर आणि नैसर्गिक शेती यासारख्या शाश्वत जीवन मूल्यांचा अवलंब करून उज्ज्वल, समृद्ध आणि स्वावलंबी भारताच्या उभारणीत सहभागी होण्याचं आवाहनही राज्यपालांनी केलं.

**<><><><><>**

दिवाळीसाठी मुंबईहून गावाकडे जाणाऱ्यांची गर्दी झाल्यानं मुंबई-पुणे महामार्गावरच्या मार्गावर वाहतूक कोंडी झाली होती. त्यामुळं वाहनं जुन्या मुंबई-पुणे महामार्गावरून वळवण्यात आली होती.

**<><><><><>**

नंदुरबार जिल्ह्यात अस्तंभा यात्रेवरून परतत असलेल्या भाविकांची गाडी चांदशैली घाटात दरीत कोसळून झालेल्या अपघातात ८ जणांचा मृत्यू झाला, तर

२७ जण जखमी झाले आहेत. आज सकाळी साडेदहाच्या सुमाराला घाटातल्या वळणावर चालकाचं गाडीवरचं नियंत्रण सुटल्यानं गाडी दरीत कोसळली. तळोदा उपजिल्हा रुग्णालयातल्या डॉक्टरांनी ६ जणांना मृत घोषित केलं, तर दोघांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. अपघातातले बहुतांश मृत आणि जखमी हे घोटाणे गावाचे रहिवासी आहेत. अपघाताच्या वेळी या गाडीत ३५ ते ४० भाविक होते. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी या अपघाताबद्दल दुःख व्यक्त केलं आहे.

**<><><><><>**

शालेय स्तरावर घेतल्या जाणाऱ्या शिष्यवृत्ती परीक्षा पुढच्या शैक्षणिक वर्षापासून चौथी आणि सातवी या इयत्तांसाठी घेतल्या जाणार आहेत. राज्य सरकारनं या निर्णयाला काल मान्यता दिली. सध्या या परीक्षा इयत्ता पाचवी आणि आठवीसाठी घेतल्या जातात. चालू शैक्षणिक वर्षात ठरलेल्या वेळापत्रकानुसार या परीक्षा होतील. त्याबरोबरच, शिष्यवृत्तीच्या रकमेत वाढ करायचा निर्णयही राज्य सरकारनं घेतला आहे. इयत्ता चौथीसाठी प्रति महिना ५०० रुपये याप्रमाणे दरवर्षी पाच हजार रुपये, तर इयत्ता सातवीसाठी प्रति महिना ७५० रुपये याप्रमाणे दर वर्षी ७ हजार ५०० रुपये इतक्या रकमेला सरकारनं मंजुरी दिली. या दोन्ही शिष्यवृत्तींचा कालावधी प्रत्येकी तीन वर्षांचा राहील, असं या संदर्भात काढलेल्या शासन निर्णयात नमूद केलं आहे.

**<><><><><>**

अन्न आणि औषध प्रशासनामार्फत राज्यात 'सण महाराष्ट्राचा, संकल्प अन्न सुरक्षिततेचा' हे विशेष तपासणी अभियान राबवण्यात येत असून याअंतर्गत १२ ऑक्टोबरपर्यंत ३ हजार ४५८ अन्न आस्थापनांची तपासणी करण्यात आली आहे. याअंतर्गत विविध खाद्यपदार्थांचे एकंदर ४ हजार ६७६ नमुने तपासण्यात आले आणि अनियमितता आढळलेल्या १ हजार ४३१ आस्थापनांना सुधारणा नोटिस देण्यात आल्याची, तर ४८ आस्थापनांचे परवाने निलंबित केल्याची, तर एका

आस्थापनेचा परवाना रद्द केल्याची माहिती अन्न आणि औषध प्रशासन विभागानं दिली आहे.

**<><><><><>**

आदिवासी टोकरे कोळी, महादेव कोळी, मल्हार कोळी, ढोर कोळी या जमातींना जात प्रमाणपत्र मिळावं, या मागणीसाठी बीड जिल्ह्यात माजलगाव इथं सहा दिवसांपासून उपोषण सुरू आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते मोहन जगताप यांनी आज उपोषणस्थळी जाऊन आंदोलकांची भेट घेतली. त्यानंतर त्यांनी माजलगाव आणि बीडचे जिल्हाधिकारी, संबंधित उपविभागीय अधिकाऱ्यांशी सविस्तर चर्चा करून सकारात्मक तोडगा काढण्याची मागणी केली.

**<><><><><>**

चीन इथं सुरू असलेल्या तिरंदाजी विश्वचषक स्पर्धेच्या कंपाऊंड प्रकारात भारताच्या ज्योती सुरेखा वेण्णम हिनं कांस्यपदक पटकावून इतिहास रचला. या स्पर्धेत पदक मिळवणारी ती पहिली भारतीय कंपाऊंड तिरंदाज ठरली आहे. कांस्यपदकासाठीच्या सामन्यात तिनं ग्रेट ब्रिटनच्या एला गिबसन हिच्यावर १५० विरुद्ध १४५ गुण मिळवून मात केली.

**<><><><><>**

कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात येत्या दोन दिवसांत तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता आहे. कोकण आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट होण्याचाही अंदाज आहे. विदर्भात उद्या हवामान कोरडं राहील, तर परवा तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता आहे. मुंबईत आज सर्वाधिक, ३७ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद सांताक्रूझ इथं झाली.

**//<><><><><>//**